दैनिक
# आपला विदर्भ
apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034
■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई
■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 81 ■ मंगळवार, दि. 21 ऑक्टोबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



## ८० टक्के समाजकारण, २० टक्के राजकारण किशोर भाऊ गारोळे!

# जनतेच्या विश्वासाचा चेहरा, मेहकरच्या विकासाचा आधार!



''सियासत में जो अमन का पैग़ाम लाया है,
वो नाम किशोर भाई कहलाया है।
कुर्सी नहीं, ज़िम्मेदारी है उनका मक़सद,
हर फैसले में जनता का एहतराम समाया है!''

**मेहकर : शांत स्वभाव, हसरा चेहरा आणि मनमिळाऊ वृत्ती या तीन गुणांच्या संगमातून उभं राहिलेलं एक नाव आज मेहकर शहरात घराघरात परिचित झालं आहे किशोर भास्कर गारोळे!गेल्या अनेक वर्षांपासून समाजकारण, उद्योग, आणि राजकारण या सर्व क्षेत्रांत सातत्याने कार्यरत असलेले किशोर भाऊ गारोळे हे आज केवळ एक राजकीय कार्यकर्ते नाहीत, तर जनतेच्या मनातील आश्वासनाचं नाव बनले आहेत.**

### समाजकारण हेच ध्येय, लोकसेवा हेच कर्म

किशोर भाऊंचं समाजकारण हे दिखाऊ नसून मनापासून केलेलं आहे. त्यांच्या संपर्कात येणारा प्रत्येक व्यक्ती त्यांना ''आपले'' मानतो. एखादा माणूस दु:खात असो किंवा अडचणीत किशोर भाऊंकडे गेला की हसतच परत येतो, अशी त्यांची छबी आहे. म्हणूनच लोक आज प्रेमाने म्हणतात ''जो रडत गेला, तो हसतच परतला... कारण तो गेला होता किशोर भाऊंकडे!''

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे) निष्ठावान कार्यकर्ते म्हणून किशोर भाऊ सध्या मेहकर शहराध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. पक्षनिष्ठा, प्रामाणिकपणा आणि लोकांशी असलेला निकटचा संवाद यामुळे त्यांनी मेहकर आणि पंचक्रोशीत स्वत:चं वेगळं स्थान निर्माण केलं आहे.

### ८० टक्के समाजकारण २० टक्के राजकारण

हा केवळ घोषवाक्य नाही, तर किशोर भाऊंच्या जीवनाचा मूलमंत्र आहे. त्यांचं कार्य म्हणजे समाजासाठी झटणं, लोकांच्या प्रश्नांना आवाज देणं आणि त्यावर उपाय शोधणं. शैक्षणिक, आरोग्यविषयक, आणि नागरी सुविधा सुधारण्याच्या अनेक उपक्रमांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला आहे.

नगरपरिषद निवडणुका समीप आल्यामुळे आज संपूर्ण मेहकरमध्ये एकच चर्चा रंगली आहे ''किशोर भाऊ गारोळे नगराध्यक्षपदासाठी उतरलेच पाहिजेत!'' जनतेचा हा आवाज त्यांच्यावरील विश्वासाचा पुरावा आहे. युवकवर्ग असो वा ज्येष्ठ नागरिक सर्वांच्याच मनात एक भावना स्पष्ट दिसते की, मेहकरच्या विकासाचा नवा अध्याय किशोर भाऊंच्या नेतृत्वात लिहिला जाईल.

### कार्यनिष्ठा आणि नेतृत्वगुणांची ओळख

किशोर भाऊंचं राजकारण हे पदासाठी नव्हे, तर जबाबदारीसाठी आहे. लोकसभा असो किंवा विधानसभा पक्षाची संघटनात्मक कामं त्यांनी प्रत्येक वेळेस कार्यकर्त्यांना सोबत घेऊन, सकारात्मक मार्गाने कामं पूर्ण केली आहेत. त्यांच्या कामाचा गाभा आहे विश्वास आणि प्रामाणिकता.

विधानसभा निवडणुकीत आमदार खरात यांना विजय मिळवून देण्यातही किशोर भाऊंची भूमिका अत्यंत मोलाची होती. आमदारांचे विश्वासू सहकारी आणि कार्यकर्त्यांचे मार्गदर्शक म्हणून त्यांची ओळख आज सर्वत्र आहे.



### जनतेचा ''भाऊ''

किशोर गारोळे हे केवळ नेते नाहीत, तर मेहकरकरांच्या मनातील आधारस्तंभ आहेत. त्यांना लोक ''भाऊ'' म्हणतात, कारण त्यांचं नातं राजकारणाचं नसून आपुलकीचं आणि माणुसकीचं आहे.कोणी संकटात असो, आजारी असो, किंवा छोट्या अडचणीत सापडलेला असो एक फोन, एक भेट, आणि किशोर भाऊ तिथे हजर! त्यांचं हे सहज, नम्र आणि मनापासूनचं वागणं लोकांच्या मनाला भिडतं.

किशोर भाऊंच्या चेहऱ्यावरचं कायमचं हसू, बोलण्यातला संयम, आणि प्रत्येक माणसाशी जवळीक निर्माण करण्याची कला हेच त्यांचं खरं व्यक्तिमत्त्व आहे. ते कधीही कोणाला दूर ठेवत नाहीत, मग तो कार्यकर्ता असो वा सामान्य नागरिक.

म्हणूनच लोक प्रेमाने म्हणतात ''नेते नाहीत, ते आपलेच माणूस आहेत जनतेचा भाऊ!''

त्यांच्या नेतृत्वात शहराच्या विकासासाठी अनेक प्रकल्प सुरू झाले आहेत तरुणांसाठी रोजगारनिर्मिती, महिलांसाठी स्वावलंबनाच्या संधी, आणि नागरिकांसाठी सहज सुविधा निर्माण करण्याचं त्यांचं ध्येय आहे. फक्त बोलून नव्हे, तर प्रत्यक्ष काम करून दाखवणं हेच त्यांचं वैशिष्ट्य आहे.

प्रत्येक समाजघटकाशी जोडलेलं त्यांचं नातं हे विश्वासावर आणि प्रामाणिकतेवर उभं आहे. त्यांनी मेहकरमध्ये जो विश्वासाचा पाया रचला आहे, तो आज प्रत्येक घरात, प्रत्येक मनात दृढ झालेला आहे.

किशोर भाऊ म्हणजे एक अशी व्यक्ती, जी नेतृत्वाचं नव्हे तर नात्याचं प्रतीक आहे. त्यांच्या उपस्थितीनं लोकांना धीर मिळतो, आणि त्यांच्या कार्यशैलीतून मेहकरला नवी दिशा मिळते. म्हणूनच आज सर्वत्र एकच आवाज घुमतो.

### ''किशोर भाऊ म्हणजे जनतेचा आधार, आणि मेहकरच्या विकासाचा आधारस्तंभ!''

किशोर भाऊ नगरपरिषदेच्या रिंगणात उतरलेच पाहिजेत!'' कारण मेहकरच्या विकासाची दिशा, स्थैर्य आणि प्रगती हे सगळं किशोर गारोळे यांच्या कार्यशैलीत सुरक्षित आहे, असा विश्वास जनतेला आहे.

राजकारणात संयम, समाजात समर्पण आणि जनतेत विश्वास या तिन्ही गोष्टींचं परिपूर्ण मिश्रण म्हणजे किशोर भाऊ गारोळे.

किशोर गारोळे हे नाव आज मेहकरमध्ये केवळ राजकारणापुरतं सीमित राहिलेलं नाही, तर लोकांच्या मनात रुजलेलं एक विश्वासाचं झाड बनलं आहे. त्यांचा शांत संयम, कार्यनिष्ठा आणि समाजसेवेचा ध्यास या सगळ्यामुळेच ते आज प्रत्येकाच्या हृदयात आपली जागा निर्माण करून आहेत.

''किशोर भाऊ हे फक्त नेते नाहीत... ते मेहकरकरांच्या भावनांचे प्रतिनिधी आहेत!''

''जो तख़्त से नहीं, लोगों के दिल से राज करते हैं, हर ग़रीब की आवाज़ में वो अंदाज़ रखते हैं। सियासत में भी इंसानियत को ज़िंदा रखा, किशोर भाई वो नाम है, जो भरोसे की मिसाल रखते हैं!''

## दिवाळी अंक म्हणजे पर्वणीच!

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ आल्यामुळे राज्यातील विरोधी पक्षही खडबडून जागे झाले. म्हणूनच राहुल गांधींनी ज्याप्रमाणे मतदार यादीच्या आणि मतचोरीच्या मुद्द्यावरुन आरोपांची राळ उडवून दिली, त्यांच्याच पावलावर पाऊल काल महाविकास आघाडीने टाकले. त्यात निवडणुका ईव्हीएमऐवजी मतपत्रिकेवर घेण्याची विरोधकांची मागणी म्हणजे आगामी निवडणुकीत दिसणाऱ्या संभाव्य पराभवाचेचे पडघम म्हणावे लागेल. महाराष्ट्रातील राजकीय पक्षांना आता मुंबईसह राज्यातील सर्व महापालिकांच्या निवडणुकांचे वेध लागले आहेत. भारतीय जनता पक्ष, शिवसेना (शिंदे), आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) या तीन पक्षांची महायुती आणि उद्धव सेना, काँग्रेस यांची महाविकास आघाडी अधिक राज ठाकरे असे दोन प्रमुख गटांमध्ये पुन्हा एकदा संघर्ष पेटणार आहे. पण, या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे निकाल आता त्या त्या शहरातील विकास कामे ठरविणार आहेत, असे दिसते. या स्थितीत उबाठा सेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने या महापालिका निवडणुकांमध्ये मतदानपत्रिकेद्वारे मतदान घेण्याची केलेली मागणी ही या पक्षांची नकारात्मक भूमिका दर्शविणारी आहे. कारण, 'ईव्हीएम'ना सर्व देशभरातील मतदारांनी आपली पसंती दिलेली आहे. पुन्हा जुन्या पद्धतीने मतदान करणे हे मागासलेपणाचे लक्षण तर आहेच; पण विरोधकांच्या पराभूत आणि नकारात्मक मानसिकतेचेही द्योतक आहे. स्पष्टच सांगायचे झाल्यास आगामी महापालिका निवडणुकीत मुंबईकरांकडे मते मागण्यासाठी उबाठा सेना आणि मनसे यांच्याकडे एकही मुद्दा नाही. मुंबई महापालिकेच्या निकालावर मुंबईतील भूमिगत मेट्रो रेल्वे सेवा, कोस्टल रोड, नवी मुंबईतील नवा विमानतळ यांसारख्या प्रकल्पांच्या यशाचा फार मोठा प्रभाव राहील, हे उघड होत चालले आहे. हीच गोष्ट अन्य शहरांच्या महापालिका निवडणुकीबाबतही निर्णायक ठरेल. कोणत्या मुद्द्यावर महाविकास आघाडी मुंबईकरांकडे मते मागणार आहे? तब्बल तीन दशके मुंबईची सत्ता हाती असूनही उबाठा सेना आणि मनसे या पक्षांकडे मुंबईकरांना सांगण्यासारखे एकही काम किंवा प्रकल्प नाही, ही किती लाजिरवाणी गोष्ट आहे? बहुदा त्याची जाणीव झाल्यामुळे काहीतरी खुसपट काढणे आणि विघ्नसंतोषीपणा करणे, यावरच या आघाडीचा भर राहील असे दिसते. मतपत्रिकेद्वारा मतदानाची मागणी ही अशाच विघ्नसंतोषीपणाचे द्योतक. राज्यातील महापालिका निवडणुकांना अजून काही महिने अवकाश असला, तरी उबाठा सेना आणि राज ठाकरे यांची खरी अडचण ही आहे की, सध्या अशी कोणतीही लाट किंवा कोणताही भावनिक विषय नाही की, ज्यावरून मुंबईकरांची मते फिरविता येतील. कारण, त्यांचे राजकारण हे ठोस कार्यापेक्षा भावनिक मुद्द्यांभोवतीच फिरते. वास्तविक गेल्या वष झालेल्या लोकसभा निवडणुकीत राज्यात महाविकास आघाडीला मोठे यश प्राप्त झाले. पण, तेव्हाही मतदान हे 'ईव्हीएम'द्वारेच घेतले गेले होते. मग तेव्हा ठाकरे बंधूंनी आणि महाविकास आघाडीतील अन्य पक्षांनी त्याविरोधात का भूमिका घेतली नाही? नंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत मतदारांनी त्याच्याबरोबर उलट निर्णय दिला. याचा अर्थ 'ईव्हीएम' असो की मतपत्रिका, त्याचा मतदानाशी काही संबंध नाही. मतदारांना कोणता पक्ष किंवा आघाडी सत्तेत आणायची आहे, त्यावरच निवडणुकीचा निकाल अवलंबून असतो. 'ईव्हीएम'ना प्रभावित करता येत नाही. पण, मतदान केंद्र ताब्यात घेऊन आपल्या उमेदवाराच्या नावावर ठप्पे मारणे अधिक सोपे आहे, हेच ही मागणी करण्यामागील खरे कारण म्हणावे लागेल. खरी गोष्ट अशी आहे की, गेली २५-३० वर्षे मुंबईकरांनी उबाठा सेनेचा कारभार जवळून पाहिला. केवळ पाहिला आहे, असे नव्हे, तर तो सहन केला आहे. केवळ 'मराठी माणूस' या एकाच निकषावर उबाठा सेनेचे सारे प्रमाद मुंबईकरांनी मोठ्या मनाने माफ केले होते. पण, त्याचा अर्थ आपण काहीही केले, तरी आपले कोणीच वाकडे करू शकत नाही आणि मुंबई महापालिकेतून आपल्याला कोणीच सत्तेबाहेर काढू शकत नाही, असा गैरसमज उबाठा सेनेने करून घेतला. महापालिकेतील प्रचंड भ्रष्टाचार हा मुंबईकरांच्या जिवावर उठू लागल्यावर मुंबईकरांनी शेवटचा घाव घालण्याचा निर्णय घेतला. उद्धव ठाकरे यांच्या अडीच वर्षांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकिदत तर मुंबईकरांचे दैनंदिन जीवन अधिकच धोकादायक आणि खडतर करण्याचा प्रयत्न झाला. त्यामुळे निवडणुकांना अद्याप तीन महिने अवकाश असला, तरी मुंबईकरांच्या मनाने महापालिकेची सत्ता कोणत्या पक्षांकडे सोपवायची, याचा निर्णय आधीच घेऊन टाकला आहे, असे जाणवते. याचे जिवंत उदाहरण म्हणजे नुकतीच सुरू झालेली आरे कॉलनी ते कफ परेड ही भूमिगत मेट्रो रेल्वे सेवा. हा मार्ग पूर्णपणे वाहतुकीस खुला केल्याच्या दुसऱ्या दिवसापासून या मेट्रोने प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत भरीव वाढ झाल्याचे स्पष्टपणे दिसून येते. आज ही मेट्रो सेवा मुंबईकरांची सर्वांत लाडकी आणि मनपसंत बनली आहे. या मेट्रोला मिळालेला उदंड प्रतिसाद पाहिल्यावर याच मेट्रोचे काम उद्धव ठाकरे यांनी आपल्या वैयक्तिक अहंकारापोटी थांबविले होते, याची सतत जाणीव मुंबईकरांना होत आहे. या वेगवान आणि सुखदायक प्रवासापासून आपल्याला या नेत्याच्या अहंकाराने तीन वर्षे वंचित ठेवले होते, हे मुंबईकर नक्कीच विसरणार नाहीत!केवळ मेट्रोच नव्हे, तर मुंबईतील कोस्टल रोडमुळेही मुंबईतील वाहतुकीची समस्या हळूहळू माग लागणार आहे. कोस्टल रोडवर प्रवासी अतिशय खूश आहेत, हे या मार्गाला मिळत असलेल्या उदंड प्रतिसादाने दिसून येते. अटल सेतूमुळेही मुंबईबाहेर झटपट पडण्यास फार मोठी मदत मिळत आहे. पुणे किंवा कोकणात जाणाऱ्यांसाठी अटल सेतू वरदान ठरत आहे. आता तर नवी मुंबईतील नव्या विमानतळामुळे या अटलसेतूचे महत्त्व अधिकच वाढेल. ठाणे आणि बोरिवली तसेच गोरेगाव-मुलुंड यांना जोडणारे नवे महामार्ग बांधले जात आहेत. मुंबईतील जनजीवन अधिक सुसह्य आणि सोयीस्कर करण्यात या पायाभूत सुविधांचा निश्चितच सिंहाचा वाटा असून त्या सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या पक्षाला त्याचा लाभ नक्कीच मिळेल. पुण्यातील मेट्रो रेल्वेलाही असाच भरभरून प्रतिसाद मिळत आहे. पुणेकरांना सार्वजनिक वाहतूक सेवेची सवय नसल्याने ही मेट्रो रेल्वे अयशस्वी ठरेल, अशी भाकिते दरडावणीच्या आवाजात करणाऱ्या नेत्याची वाचा या मेट्रोला पुणेकर देत असलेला प्रतिसाद पाहून बसली आहे.दिवाळीनिमित्त शिवाजी पार्कभोवती रोषणाई करण्याच्या मनसेच्या उपक्रमाचे उद्घाटन उद्धव ठाकरे करणार आहेत. पण, महापालिका निवडणुकीत महाविकास आघाडीने नकारात्मकतेचे दिवे पेटविले आहेत, ते निकालानंतर विझल्याशिवाय राहणार नाही!

# लक्ष्मीपूजन : समृद्धीचा उजेड आणि अंतर्मनाचा प्रकाश

दिवाळी म्हणजे अंधारावर प्रकाशाचा विजय. परंतु हा प्रकाश केवळ दिव्यांच्या ज्योतीत नसतो; तो मनाच्या शुद्धतेत, विचारांच्या तेजात आणि संवादाच्या ऊबेतही झळकतो. दरवर्षी जसा कार्तिक अमावास्येच्या रात्री लक्ष्मीपूजनाचा सण येतो, तसाच तो भारतीय मनाच्या स्वभावाशी एकरूप होतो. दिव्यांच्या रांगा, सुगंधी हवा, घंटांचा नाद आणि प्रसन्न चेहऱ्यावरील तेज हे सर्व केवळ बाह्य सौंदर्य नाही, तर संस्कृतीच्या दीर्घ परंपरेचा सजीव श्वास आहे.

दिवाळी हा केवळ आनंदाचा नाही, तर आत्मशुद्धतेचा सण आहे. 'अंधारातून प्रकाशाकडे' हा मंत्र या काळात नव्या अर्थाने जागतो. लक्ष्मीपूजनातला हा प्रकाश केवळ सुवर्णमुद्रांचा नाही, तो अंतर्मनातील विवेक, संयम आणि कृतज्ञतेचा आहे. संपत्ती म्हणजे केवळ धन नव्हे; समृद्धी म्हणजे नीती आणि संतुलन. म्हणूनच लक्ष्मीपूजन मूळात एक मूल्यसंस्काराचा उत्सव आहे.

'लक्ष्मी' हा शब्द 'लक्ष्य' या धातूपासून आलेला आहे. त्यामुळे लक्ष्मी म्हणजे जी आपल्याला योग्य लक्ष्य साध्य करण्याची प्रेरणा देते. ती फक्त संपत्तीची नव्हे, तर संतुलित जीवनशैलीची प्रतीक आहे.

अष्टलक्ष्मीच्या रूपांत धर्मलक्ष्मी,




धनलक्ष्मी, धान्यलक्ष्मी, संतानलक्ष्मी, सौंदर्यलक्ष्मी, विजायलक्ष्मी, ऐश्वर्यलक्ष्मी आणि विद्यालक्ष्मी जीवनाचे बहुविध पैलू प्रकट होतात. धनलक्ष्मी पोटभर अन्न देते, तर विद्यालक्ष्मी विचारांचा उजेड फेकते. लक्ष्मीपूजन हे या सर्व शक्तींचा सन्मान आहे, ज्या आपल्या अस्तित्वात बिंबलेल्या आहेत.

लक्ष्मीपूजन हे कृतज्ञतेचे प्रतिक आहे. आज व्यापारी आपली नवी बही पूजा करतात, शेतकरी शेतातील पिकांसाठी कृतज्ञता व्यक्त करतो, आणि गृहिणी घरात सौख्य राखते. पूजेतील प्रत्येक कृती कलश, नारळ, स्वस्तिक किंवा फुले हे केवळ प्रतीक नाहीत, तर मूल्यांचे स्मरण आहेत. कलशातील जल शुद्धतेचे, नारळ स्थैर्याचे, स्वस्तिक शुभतेचे आणि फुले कृतज्ञतेचे द्योतक आहेत. केरसुणी पूजनातही हा गूढ अर्थ उमटतो. 'अलक्ष्मी निवारण' म्हणजे दुः स्वभाव, लोभ आणि मत्सर यांपासून स्वतःला मुक्त करणे. दिव्यांची रांग जशी अंधाराला हद्दपार करते, तसा हा संस्कार आपल्या दुर्गुणांना झाकोळतो.

लक्ष्मीपूजनाची खरी अर्थवत्ता धनप्राप्तीमध्ये नाही, तर मनःशांतीत आहे. जैन परंपरेनुसार, भगवान महावीर मोक्षप्राप्तीनंतर याच रात्री गौतम गणधरांना केवळ ज्ञान प्राप्त झाले "ज्ञानलक्ष्मी"च्या रूपात. म्हणून ही रात्र आत्मकल्याणाची स्मृती आहे. भगवद्गीतेत सांगितल्याप्रमाणे "संयम, श्रद्धा आणि सत्कर्मातच खऱ्या समृद्धीचा वास असतो." लक्ष्मी म्हणजे श्रद्धेचा उजेड, लोभाचा अंधार नाहीसा करणारी शक्ती.

आजच्या काळात लक्ष्मीपूजनाचे स्वरूप बदलले आहे. उपभोक्तावाद, ऑनलाइन व्यवहार आणि झगमगाटाच्या युगातही हा सण आपल्याला भावतो संपत्ती कमवा, पण ती सत्य आणि नीतीच्या मार्गाने उपभोगा. "सस्टेनेबल समृद्धी" म्हणजे केवळ आर्थिक स्थैर्य नव्हे; ती पर्यावरण, सामाजिक न्याय आणि नैतिकतेच्या संतुलनातून येते. स्वदेशी उत्पादनांचा वापर, पर्यावरणपूरक सण आणि ईमानदारी ही आधुनिक लक्ष्मीपूजनाची नवी भाषा आहे.

या दिवशी संध्याकाळी घरोघरी दीप लावले जातात. मंद वायूत वहात असलेला फुलांचा सुवास, आरतीच्या ध्वनींसह लखलखणारे दिवे जणू प्रत्येक घर मंदीर झाले आहे. ओवाळणीवेळी स्त्रियांच्या मुद्रेवर उमटणारे तेज जीवनाची खरी समृद्धी दाखवते; मुलांच्या हातातील फुलबाज्या आणि वृद्धांच्या आशीर्वादातील ऊब हा आनंदाचा प्रकाश कायम टिकवते. ही रात्र केवळ पूजा नाही, तर कुटुंबांच्या नात्यांचा पुनर्बंध आहे.

लक्ष्मी म्हणजे नशिबाची देणगी नव्हे; ती परिश्रम, श्रद्धा आणि सत्यतेची प्रसादरूप समृद्धी आहे. लक्ष्मीपूजन शिकवते संपत्ती कमवा, पण ती सन्मार्गाने खर्च करा. अमावास्येच्या काळोखात जसा एक दीप संपूर्ण घर उजळवतो, तसाच नीतिचा, विवेकाचा दीप अंतर्मनात उजळला पाहिजे.या प्रकाशोत्सवात प्रत्येकाने आपल्या अंतर्मनात 'नीतीलक्ष्मी' जागवावी. कारण खरी संपत्ती म्हणजे पैसा नव्हे, तर संयम, कृतज्ञता आणि करुणा. दिवाळीच्या दिव्यांचा प्रकाश बाहेरच्या अंधाराला नाही तर आपल्या आतल्या लोभ-अंधाराला दूर करतो. म्हणून प्रत्येक दीप हा एक संकल्प असावा "सत्य, श्रम व सदाचार यांच्या उजेडातच लक्ष्मी नांदते." लक्ष्मीपूजन म्हणजे धनवाढीची अपेक्षा नव्हे, तर आत्मविकासाची आराधना आहे. समृद्धी ही नशिबाचा परिणाम नसून संस्कार आणि सत्यतेचा प्रसाद आहे.

अमावास्येच्या काळोखात जसा दीप उजळतो, तसाच श्रद्धेचा आणि सचोटीचा दीप आपल्या अंतर्मनात उजळावा, हीच या सणाची खरी भावना आहे. आधुनिक युगातही, दिवाळीचा दिवा फक्त घर उजळवत नाही, तो मनातील लोभ-अंधारही दूर करतो. या प्रकाशोत्सवात, दिव्यांच्या रांगेत उभा प्रत्येक मनुष्य आपल्या अंतर्मनातील 'नीतीलक्ष्मी'ला जागवो, आणि त्या प्रकाशात समृद्धी, शांती व सौंदर्य नांदो हीच शुभेच्छा!

## डिफेंडर कार प्रकरणात ठेकेदार निलेश ढवळे अखेर माध्यमांसमोर "गाडी माझीच, कमिशन पोटी दिलेली नाही"

**बुलढाणा/प्रतिनिधी:** बुलढाण्यात गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेल्या डिफेंडर कार प्रकरणावर अखेर ठेकेदार निलेश ढवळे यांनी माध्यमांसमोर येऊन स्पष्टीकरण दिले आहे. "ही डिफेंडर कार माझीच आहे, कोणत्याही प्रकारच्या कमिशनच्या मोबदल्यात दिलेली नाही," असे ढवळे यांनी स्पष्ट केले.




या प्रकरणाची सुरुवात भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांनी केली होती. त्यांनी पत्रकार परिषदेत प्रश्न उपस्थित केला होता की, "आमदार संजय गायकवाड यांनी कोणत्या कामाच्या कमिशनमधून कोट्यवधी रूपयांची डिफेंडर कार घेतली?" या वक्तव्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती.

दरम्यान, या गाडीबाबत अशी चर्चा सुरू झाली की ही डिफेंडर कार शहरातील सौंदर्यीकरण आणि इतर नागरी विकास कामे करणारे ठेकेदार निलेश ढवळे यांच्या नावावर असून त्यांनी ती शिवसेना (ठाकरे गटाचे) आमदार संजय गायकवाड यांना भेट म्हणून दिली आहे. मात्र या सर्व चर्चे ला पूर्णविराम देत आमदार संजय गायकवाड यांनी स्पष्टीकरण दिले की "डिफेंडर कार निलेश ढवळे यांचीच आहे. ते माझे नातेवाईक आहेत. त्यांनी मला ही गाडी तात्पुरती वापरण्यासाठी दिली आहे. यामागे कोणतेही व्यवहार किंवा कमिशन नाही." यावर आता निलेश ढवळे यांनी स्वतः माध्यमांसमोर येऊन म्हटले की, डिफेंडर माझीच आहे. मी ती कर्ज काढून घेतली आहे. मला गाड्यांचा छंद आहे. आमदार गायकवाड माझे नातेवाईक आहेत तसेच आम्ही त्यांचे कार्यकर्ते आहोत. त्यामुळे मी त्यांना ही गाडी तात्पुरती वापरण्यासाठी दिली आहे. कमिशन पोटी किंवा इतर कोणत्याही व्यवहारातून ही गाडी दिलेली नाही."

गाडीच्या नंबराबाबत विचारले असता ढवळे म्हणाले की, आमदारांच्या कार्यकर्त्यांच्या गाड्यांचे नंबर बहुतेक सारखेच असतात. त्यामुळे या गाडीचा नंबरही तसाच ठेवला आहे. गाडीवर आमदारांचा सिम्बॉल टाकला कारण तो फक्त इम्प्रेशनसाठी होता."

ढवळे यांनी पुढे सांगितले की, दिवाळीनंतर मी गाडी परत घेणार आहे. आणि जर या प्रकरणाची चौकशी झाली तरी मी पूर्णपणे सहकार्य करण्यास तयार आहे."

या सर्व घडामोडींमुळे बुलढाण्यात राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे. एका गाडीभोवती सुरू झालेला हा वाद आता आमदार, ठेकेदार आणि पक्षीय स्तरावर चर्चेचा विषय ठरला आहे. "डिफेंडर माझीच आहे. मी कर्ज काढून घेतली आहे. आमदार संजय गायकवाड माझे नातेवाईक आहेत. गाडी त्यांना तात्पुरती वापरण्यास दिली आहे. कोणत्याही कमिशनचा यात संबंध नाही. चौकशी झाली तरी मी सामोरे जाणार आहे."

## आमदार बच्चू कडू यांच्या वादग्रस्त वक्तव्यावर शंभूराज देसाईंची टीका

**सातारा/प्रतिनिधी:** आमदार बच्चू कडू यांनी अलीकडे केलेल्या "आमदारांना कापा" या वक्तव्यावर राज्याचे मंत्री शंभूराज देसाई यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. "बच्चू कडू हे आमचे विधिमंडळातील सहकारी आहेत, मात्र 'कापून काढा, तोडून काढा' अशा भाषेचा वापर लोकशाही व्यवस्थेमध्ये करणे अजिबात योग्य नाही," असे देसाई म्हणाले.

ते पुढे म्हणाले, "आपल्याला संताप व्यक्त करायचा असेल तर तो लोकशाही मार्गाने व्यक्त करा आंदोलन करा, प्रश्न उपस्थित करा, चर्चा घडवा. पण आमदारांना 'कापा' असे म्हणणे म्हणजे त्यांच्या जीवाला धोका निर्माण करण्यास लोकांना प्रवृत्त करणे होय. अशा प्रकारचे भाष्य अत्यंत चुकीचे आणि गैरजबाबदार आहे."

संजय राऊत यांच्यावरही टीका

शंभूराज देसाई यांनी संजय राऊत यांच्या भाऊबंदकीवरील टीकेवर प्रत्युत्तर देताना सांगितले, "राऊत दुसरं काही बोलू शकत नाहीत. मी त्यांना कालच सांगितलं होतं तुम्ही भाऊ एकत्र आहात का नाही, हे आमचं देणं-घेणं नाही. दोन्ही भाऊ एकत्र आले, तर आम्हाला आनंदच आहे."

ते पुढे म्हणाले, "तुम्ही एकमेकांविरोधात घेतलेल्या टोकाच्या भूमिका, केलेले आरोप हे सर्व जर तुम्ही विसरलात, तरी आम्हाला फरक नाही. पण एकनाथ शिंदेंना इशारा देण्याऐवजी २०२२ मध्ये ५० आमदार एकत्र आले होते, याचीच तुम्हाला धडकी बसलेली आहे. त्यातून अजून तुम्ही सावरलेले नाही. आता महानगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये तुम्हाला दुसरा धक्का बसणार आहे, याची काळजी करा." रोहित पवारांच्या आंदोलनाबाबत प्रतिक्रिया विरोधी पक्षाचे नेते रोहित पवार यांच्या आंदोलनाबाबत बोलताना देसाई म्हणाले, "विरोधकांचे कामच आंदोलन करणे हे आहे.

# डोणगाव जिल्हा परिषद सर्कलमध्ये इच्छुकांची तोबा गर्दी; नव्या चेहऱ्यांच्या प्रवेशाने प्रस्थापितांना धक्का बसणार?

## गावोगावी राजकीय गप्पांना ऊत; प्रत्येक गल्ली निवडणूकवेडी

**डोणगाव/प्रतिनिधी:** तालुक्यातील सर्वाधिक चर्चेत असलेल्या डोणगाव जिल्हा परिषद सर्कलमध्ये निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून, इच्छुक उमेदवारांची अक्षरशः तोबा गर्दी झाली आहे. आरक्षण सुटल्यानंतर हे सर्कल ओपन झाल्याने सर्वच पक्षांतील कार्यकर्त्यांनी उमेदवारीसाठी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. प्रस्थापित नेत्यांसह नव्या चेहऱ्यांचा सहभाग वाढल्याने डोणगाव सर्कलमधील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलण्याची चिन्हे दिसत आहेत.

डोणगाव सर्कलचे वाढते महत्त्व डोणगाव जिल्हा परिषद सर्कल हे तालुक्यातील महत्त्वाचे आणि प्रभावी सर्कल मानले जाते. गेल्या काही निवडणुकांमध्ये या सर्कलमधून प्रभावी नेत्यांनी जिल्हा परिषदेत आपली छाप सोडली आहे. त्यामुळे प्रत्येक निवडणुकीत येथे उमेदवारांची चढाओढ वाढतेच. यंदाही त्याला अपवाद नाही. आरक्षण सुटल्यानंतर सर्कल खुलं झाल्याने सर्व राजकीय पक्षांतर्गत हालचालींना वेग आला आहे.

नव्या चेहऱ्यांचा जोरदार प्रवेश यावेळी डोणगाव सर्कलमध्ये नव्या पिढीतील अनेक तरुण कार्यकर्त्यांनी थेट राजकारणात उडी घेतली आहे. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा प्रमुख गोपाल आखाडे, अमोल पळसकर, आणि ॲड ज़ैनुल आबेद्दीन शेख ही नावे सध्या विशेष चर्चेत आहेत. या नव्या उमेदवारांनी मतदारसंघात सातत्याने सामाजिक, शैक्षणिक आणि युवकांसाठी उपक्रम राबवले असून, जनसंपर्क मोहिमेला वेग दिला आहे. या उमेदवारांचा ऊर्जावान प्रचार, सोशल मीडियाचा वापर, आणि युवकांशी थेट संवाद यामुळे मतदारवर्गात नव्या पिढीच्या नेतृत्वाकडे अपेक्षेने पाहिले जात आहे.

प्रस्थापित नेते पुन्हा रिंगणात दुसरीकडे, अनुभवी आणि प्रस्थापित नेतेदेखील आपला प्रभाव टिकवण्यासाठी सज्ज झाले आहेत. राजेंद्र पळसकर, निंबाजी पांडव, शैलेश सावजी, संजय आखाडे, अर्जुनराव वानखेडे, आणि

प ं क ज

पळसकर

य ा



नेत्यांनी यापूर्वीच्या निवडणुकांमध्ये भक्कम मताधिक्याने विजय मिळवला होता. या नेत्यांकडे मजबूत कार्यकर्त्यांचा तळ, अनुभव आणि जनतेशी सातत्याने जुळलेले संबंध हे बलस्थान आहे.

तथापि, नव्या चेहऱ्यांचा उदय आणि स्थानिक पातळीवरील बदलते राजकारण यामुळे यंदा स्पर्धा काट्याची होणार हे स्पष्ट दिसते.

स्थानिक समीकरणे बदलत्या मार्गावर डोणगाव सर्कलमध्ये सध्या प्रत्येक गटातील हालचालींना वेग आला आहे. काही नेते स्वतंत्र उमेदवारीचा विचार करत आहेत, तर काहींनी पक्षांतर्गत चर्चा सुरू केली आहे. सहकारी संस्था, शैक्षणिक मंडळे, आणि ग्रामपंचायतींमधील नेतृत्व गटांमुळेही या सर्कलमध्ये राजकीय समीकरणे अधिक गुंतागुंतीची बनली आहेत. स्थानिक राजकीय जाणकारांच्या मते, मतदारांचा मूड यंदा "बदल"कडे झुकलेला दिसतो. युवक मतदारांना पारदर्शक, प्रगतीशील आणि नव्या विचारांचे नेतृत्व हवे आहे, तर प्रस्थापित नेत्यांकडे अनुभव आणि विकासकामांचा ठोस पुरावा आहे. त्यामुळे दोन्ही बाजूंकडून प्रचार अधिक आक्रमक होण्याची शक्यता आहे.

मतदारांच्या चर्चांना ऊत गावोगावी सध्या राजकीय चर्चांना ऊत आला आहे. चौकात, हॉटेलांमध्ये, शेतात किंवा शाळांच्या आवारात सर्वत्र डोणगाव सर्कलची निवडणूक हा चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. "यावेळी कोण पुढे?", "नव्या चेहऱ्यांना संधी मिळेल का?", "प्रस्थापित नेत्यांचे वर्चस्व टिकेल का?" या प्रश्नांवर मतदारांमध्ये खुमासदार चर्चा रंगल्या आहेत.

काही ठिकाणी मतदारांनी विकासावर चर्चा केंद्रित केली असली तरी, स्थानिक गट-राजकारण आणि वैयक्तिक संबंधही या निवडणुकीत निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.

एकूणच, डोणगाव जिल्हा परिषद सर्कलची निवडणूक ही "अनुभव विरुद्ध उत्साह" अशी ठरणार आहे. नव्या चेहऱ्यांनी उत्साहाचा नवा प्रवाह निर्माण केला असला, तरी प्रस्थापित नेत्यांकडे भक्कम गटबांधणी आणि अनुभव आहे. कोणावर मतदारांचा विश्वास बसतो आणि कोण सर्कलमध्ये आपले वर्चस्व सिद्ध करतो, हे येणाऱ्या काही दिवसांत स्पष्ट होईल. डोणगाव सर्कल प्रत्येक गल्ली निवडणूकवेडी; मतदारांच्या चर्चांनी राजकीय तापमान कमालीचे वाढवले आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# लहान हातांनी उजळली शाळा!; प्रत्येक दिवा सांगतो आनंद वाटला की प्रकाश वाढतो!

दैनिक आपला विदर्भ

■ गजानन जाधव

**बेलगाव** : आज बेलगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेत आमच्या शाळेच्या छोट्या मित्रांनी दीपावलीचा दीपोत्सव साजरा केला. मुलांनी स्वतःच्या हातांनी बनवलेले सुंदर हस्तकंदील, आकाशदिवे आणि रंगीत सजावट शाळेचे अंगण उजळून टाकले.

काहींनी फुलांसारखे कंदील तयार केले, तर काहींनी ताऱ्यासारखा चमकणारा दिवा लावला. प्रत्येक दिवा त्यांच्या मनातील आनंद आणि कल्पकतेचे प्रतीक होता. त्यांच्या चेहऱ्यावरचा हसरा आणि उत्साही आनंद पाहून शिक्षकांनाही खूप आनंद झाला.

शाळेचे मुख्याध्यापक खवाल सर, राऊत सर, पिंपळकर सर, जामकर सर, अंभोरे मॅडम, ओ'मेरा मॅडम आणि उर्दू शाळेचे मुख्याध्यापक रहीम सर व शेख सर यांनी कार्यक्रमास उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. शिक्षकांनी मुलांना प्रोत्साहित करत सांगितले, ''तुमच्या हातांनी बनवलेले हे दिवे केवळ प्रकाश नव्हे, तर आनंद पसरवतात.''

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना शिक्षकांकडून गोड जिलबी वाटण्यात आली. गोड जिलबीच्या चवीसोबत मुलांच्या चेहऱ्यावरील हास्य अधिक खुलले आणि शाळेचा परिसर आनंदाने भरला. ही दीपावली शाळेतील लहानग्यांसाठी केवळ सुट्टीचा दिवस नव्हती, तर मेहनतीने आणि प्रेमाने बनवलेल्या दिव्यांचा, हास्याचा आणि आनंदाचा सर्वात सुंदर उत्सव ठरला.





## संक्षिप्त...

### मित्राचा गळा कापून खून करणाऱ्या आरोपीची पोलिसांनी काढली धिंड



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : जवाहर नगर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये मित्राने मित्राचा खून केल्याची घटना घडली असून, त्या आरोपीची आज पोलिसांनी धिंड काढली. छत्रपती संभाजी नगर हद्दीतील शाळेच्या मैदानावर रात्रीच्या सुमारास दोन मित्र ग्राउंड वर मद्यपान करत असताना दोघांमध्ये किरकोळ कारणावरून वाद झाला. त्यामध्ये एका मित्राने दुसऱ्या मित्राचा गळा कापला, त्याची आज जवाहर नगर पोलिसांनी डॉक्टर हेगडेवार रुग्णालय येथून धिंड काढण्यात आली. या आरोपीवर या अगोदरही गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलीस निरीक्षक सचिन कुंभार यांनी दिली आहे.

### बीडमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची लगबग; भाजपची कार्यकर्ता बैठक संपन्न



दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी** :स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध लागले असून दिवाळीनंतर आचारसंहिता लागू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नगरपरिषद, नगरपंचायती, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका लवकरच जाहीर होण्याची चिन्हे दिसत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी आरक्षण सोडत जाहीर झाल्याने राजकीय पक्षांकडून उमेदवारांची चाचपणी सुरू झाली आहे. गेवराई नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या तयारीसाठी भारतीय जनता पक्षाकडून इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती आणि कार्यकर्ता बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मात्र नगराध्यक्ष पद महिलांसाठी राखीव असल्याने महिलांची उपस्थिती कमी होती. यावर प्रतिक्रिया देताना भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख म्हणाले की, ''दीपावलीच्या सणामुळे काही महिला बैठकीला येऊ शकल्या नाहीत, पण त्यांनी आपल्या प्रतिनिधींना उपस्थित राहण्यास सांगितले आहे.''

### मराठा आरक्षणामुळे ओबीसी आरक्षणावर परिणाम झाल्याचा पुरावा आहे का ?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकारने मराठा समाजाला संविधानाच्या चौकटीत राहून आरक्षण दिले आहे. मराठा समाजाला दिलेल्या या आरक्षणामुळे ओबीसी आरक्षणावर परिणाम झाल्याचा पुरावा आहे का ? असा रोकडा सवाल कॅबिनेट मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी उपस्थित केला आहे. ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यातील काही नेते राजकीय वातावरण तापवण्याचा प्रयत्न करत आहेत. या पार्श्वभूमीवर विखे पाटील यांनी हा प्रश्न उपस्थित केला आहे.

बीडमध्ये नुकताच ओबीसी महाएल्गार मोर्चा झाला. या मोर्चात छगन भुजबळ यांनी ओबीसी आरक्षण संपल्याचा घंटानाद करत मराठा आंदोलक मनोज जरांगे, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला होता. या संदर्भात प्रतिक्रिया विचारताच विखे पाटील आरक्षणाच्या मुद्यावर थेट सवाल उपस्थित केला.

ओबीसी आरक्षण कमी झाल्याचा पुरावा आहे का ? असा रोकडा सवाल करत विखे पाटील यांनी पलटवार केला. मराठा-कुणबी जीआरमुळे ओबीसी आरक्षण कमी झालं आहे, असं म्हणणं चुकीचं आहे. कायद्याच्या चौकटीत राहून आरक्षणाचा विषय मार्गी लावला आहे. ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाचा प्रश्न सोडवला आहे; असेही विखे पाटील म्हणाले. ओबीसी आणि मराठा समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न सुरू आहे, हे महाराष्ट्राच्या पुरोगामी परंपरेला शोभणारं नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं आहे की, आमच्या डीएनएमध्ये ओबीसी आहे. त्यामुळे समाजात गैरसमज निर्माण करू नयेत. म हाराष्ट्रात कधीच 'ओबीसी दिवाळी' आणि 'मराठा दिवाळी' अशी विभागणी झालेली नाही. आपण सर्वजण एकत्र राहणारे आहोत; असे विखे पाटील म्हणाले.

## मतदार यादीचा घोळ हा निवडणुकीचा मोठा फंडा : बाळासाहेब थोरात

दैनिक आपला विदर्भ



**नाशिक/प्रतिनिधी** :काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी नाशिकमध्ये बोलताना निवडणुकीपूर्वीच्या मतदार यादीतील गोंधळावर जोरदार टीका केली. ''मतदार यादीचा घोळ हा निवडणूक जिंकण्यासाठी वापरला जाणारा मोठा फंडा आहे,'' असे थोरात यांनी स्पष्टपणे म्हटले.

थोरात म्हणाले, ''मतदारांच्या याद्यांमध्ये प्रचंड घोळ आहे, ही वस्तुस्थिती आहे. काही ठिकाणी बनावट नावं घुसवली गेली आहेत. याची दुरुस्ती तातडीने झालीच पाहिजे. आम्ही देखील मतदार याद्यांच्या शुद्धीकरणाच्या बाजूने आहोत.''

ते पुढे म्हणाले, ''निवडणुकीसाठी अनेक प्रकारचे फंडे वापरले जात आहेत. बाहेरचे लोक आणून मतदार यादीत नावं घालायची, वेगवेगळे मतदान घडवून आणायचे हे लोकशाहीसाठी अत्यंत दुर्दैवी आहे. डिजिटल काळातसुद्धा असे प्रकार होत आहेत, हे चिंताजनक आहे. मतदान हे लोकशाहीचे मूलभूत सूत्र आहे आणि त्यालाच बाधा पोहोचवली जात आहे.''

दरम्यान, पुरोहित संघाच्या मंत्रतंत्र अभ्यासक्रमावर टीका करताना थोरात म्हणाले, ''मंत्र-तंत्राचे धडे देण्याऐवजी सरकारने शेतकऱ्यांना मदत केली पाहिजे. मराठवाड्यात शेतकऱ्यांना कुठे आणि किती मदत मिळाली? हे दाखवता येत नाही. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडून लोकांचे लक्ष विचलित करण्यासाठी धर्म आणि जातीय विषय पुढे आणले जात आहेत. मंत्र-तंत्राचे अभ्यासक्रम सुरू करत असाल, तर यापेक्षा वाईट काही असूच शकत नाही.''मतदार यादींचा घोळ हा लोकशाहीसाठीही दुर्दैव आहे,'' बाळासाहेब थोरात



क्रिकेटर सूर्यकुमार यादव सरकुटुंब साईचरणी लीन

## नवीन वर्षात कल्याणवासियांची होणार वाहतूक कोंडीतून मुक्तता

**कल्याण/प्रतिनिधी** : कल्याण - डोंबिवली महापालिकेची स्मार्ट सिटी प्रकल्पात निवड झाल्यानंतर कल्याण स्टेशन परिसरात वाहतूक सुधारणा प्रकल्पाच्या कामास वेग आला आहे. मुरबाड रस्त्यावरील सुभाष चौक ते बैलबाजार चौक दरम्यान १६३० मीटरचा उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या उभारणीत भूसंपादन, एसटी स्थानकाच्या जागेवर काम करण्यास लागणारी ना हरकत, रेल्वेची जागा, हॉटेल्सची बांधकामे, गाळे धारकांचे पुनर्वसन यासारख्या तांत्रिक अडचणीमुळे हे काम रखडले होते. आता यातील १३४६ मीटरचे काम पूर्ण झाले असून अडथळे दूर झाल्याने उर्वरित काम देखील वेगाने पूर्ण करणे शक्य होऊ शकेल असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. कल्याण रेल्वे स्थानकात सुरू असलेल्या वाहतूक सुधारणा प्रकल्पातील उड्डाणपुलाचे काम केव्हा पूर्ण होणार याकडे वाहतूककोंडीने ग्रासलेल्या नागरिकांचे लक्ष आहे.

## एकाच डिपॉझिट गेलं, एकाची इज्जत गेली; हा कसला ठाकरे ब्रँड? किरीट सोमय्या यांचा टोला

दैनिक आपला विदर्भ



**पुणे/प्रतिनिधी** : भाजप नेते किरीट सोमय्या यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत ठाकरे बंधूंपासून ते बेकायदेशीर बांगलादेशी नागरिकांपर्यंत अनेक मुद्द्यांवर जोरदार निशाणा साधला.

मुंबईतील बांगलादेशी नागरिकांविषयी बोलताना सोमय्या म्हणाले, ''हिंदू नाव घेत बाबू खान स्वतःला किन्नर म्हणून दाखवत होता. पोलिसांनी या प्रकरणाचा पर्दाफाश केला असून, त्याने तब्बल ३०० बांगलादेशींना देशात आणल्याचं उघड झालं आहे.'' त्यांनी सांगितलं की, या प्रकरणाबाबत त्यांनी पोलिसांशी चर्चा केली असून आज संबंधित पोलिस स्टेशनमध्ये भेट देणार आहेत. तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ''कोंबिंग ऑपरेशन'' करण्याची मागणी केली आहे.

सोमय्या पुढे म्हणाले, ''या भागात हजारो बेकायदेशीर लोक राहतात. विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या मर्त्य नेत्यांनी मौलवी उमेदवार उभे केले होते. मी अशा अनेक घोटाळ्यांचा पर्दाफाश केला आहे बोगस जन्म प्रमाणपत्रांपासून आधार कार्ड घोटाळ्यांपर्यंत.''

त्यांनी सांगितले की, राज्यात सुमारे ४७ हजार बोगस आधार कार्ड उघडकीस आली आहेत. ''आरोग्य आणि जन्म-मृत्यू नोंदणीचे अधिकार राज्यांकडे असल्याने केंद्राला यात हस्तक्षेप करता येत नाही. मात्र, २०१९ नंतर अनेक कठोर कायदे करण्यात आले आणि अनेकांना अटक झाली,'' असेही त्यांनी स्पष्ट केले.

ठाकरे बंधूंबाबत बोलताना सोमय्या यांनी पुन्हा एकदा जोरदार हल्ला चढवला. ''एकाचं डिपॉझिट गेलं आणि एकाची इज्जत गेली; हा कसला ठाकरे ब्रँड? लोकसभा २०२४ मध्ये उद्धव ठाकरेंनी लोकांची फसवणूक केली. म्हणून लोकांनी मतदान केलं नाही. हे सगळे हिरवे वस्त्रधारी आहेत,'' असा कडवा आरोप त्यांनी केला.

## तापी काठावर ११ हजार दिव्यांची रोषणाई



तापी नदी काठावरील संगमेश्वर महादेव मंदिर परिसरात सुमारे ११,००० दिव्यांची रोषणाई करीत माजी मंत्री तथा विद्यमान आमदार डॉ विजयकुमार गावित यांच्या हस्ते संगमेश्वर येथे महाआरती करण्यात आली. तापी काठावरील या दीप सोहळ्याचा आनंद घेण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक आणि नागरिक उपस्थित होते.


आपला विदर्भ व आपला विदर्भ लाईव्ह
परिवाराकडून - सर्व महाराष्ट्रातील वाचकांना दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा
'या प्रकाशाच्या पावन सणाला आपले घर-आंगण आनंदाने आणि समृद्धीने उजळून निघो.
दिव्यांनी अंधकार दूर होवो, नवं वर्ष नवी आशा आणि उत्तम आरोग्य घेऊन येवो.
आपल्या सर्वांवर सुख, शांती आणि आर्थिक समृद्धीची छाया सदैव राहो.
आपला विदर्भ व आपला विदर्भ लाईव्ह आपल्या सेवेत प्रेरित आणि प्रकाशमान.'
आपला विदर्भ
LIVE
प्रत्येक क्षण आपल्या सोबत...


आनंद, उत्साह, समृद्धी व प्रकाशाने
उजळो आपल्या जीवनाचा प्रत्येक क्षण!
दिपावलीच्या
समस्त जनतेला
हार्दिक शुभेच्छा
*आधारस्तंभ*
-:शुभेच्छुक:-
प्रा गोपाल सुभाषराव आखाडे
जिल्हाप्रमुख:-राष्ट्रवादी युवक काँग्रेस बुलढाणा


सर्वांना
दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा..
-शुभेच्छुक-
|| श्री गजानन महाराज प्रसन्न ||
प्रयाग दुध डेअरी
डेली निड्स & कोल्ड्रींक्स
* तुप * दही * ताक * पनीर * दुध
उत्तम क्वालीटीचे दुध मिळेल
प्रो.प्रा.राहुल सु.पळसकर
मो.9850175169
7385785009
प्रयाग मल्टीसर्व्हिसेस
झेरॉक्स


घेवुनी दिव्यांचा प्रकाश सोनेरी
माळोणी गंध मधुर उटण्याचा,
करा संकल्प सुंदर जगण्याचा
गाठोणी मुहूर्त दिवाळी सणांचा..!
दिपावलीच्या
समस्त जनतेला
हार्दिक शुभेच्या
मा.श्री.डॉ.शिवाजीराव पंढरी ढाकणे
सरपंच ग्रा.पं. महारचिकना
मा. श्री. दत्ता राम बेंडमाळी
ग्रामपंचायत अधिकारी महार चिकना
सर्व ग्रामपंचायत सदस्य
अध्यक्ष जिल्हा परिषद शाळा व्यवस्थापन समिती
अध्यक्ष महात्मा गांधीतंटामुक्त गाव समिती महार चिकना
पाणीपट्टी घरपट्टी भरून ग्रामपंचायतला सहकार्य करा
ग्रामपंचायत कार्यालय महाचिकना


जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा, बेलगाव
आपल्या सर्व विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांना
आनंद, उजळ भविष्य आणि सुख-समृद्धीने न्हालेल्या
दिवाळीच्या
मन:पूर्वक शुभेच्छा..!
ज्ञानाच्या प्रकाशाने उजळू दे प्रत्येकाचे आयुष्य !
::शिक्षकवृंद::
श्री. के. एन. खवाल (मुख्याध्यापक), व्ही. पी. जामकर सर (सहाय्यक शिक्षक)
एस. बी. राऊत सर (सहाय्यक शिक्षक), व्ही. एस. पिंपरकर सर (सहाय्यक शिक्षक)
कु. व्ही. पी. अंभोरे मॅडम (सहाय्यक शिक्षिका), रहीम सर (उर्दू शाळा – मुख्याध्यापक)
शेख सर (सहाय्यक शिक्षक)
चला साजरी करूया —ज्ञान, संस्कार आणि प्रकाशाचा उत्सव — "दिवाळी 2025"
आनंदाने, एकतेने आणि हसतमुखाने!
जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा, बेलगाव


|| श्रद्धास्थान ||
स्व. प्राचार्य सि.म.वानखेडे
संस्थापक अध्यक्ष
दिवाळीच्या
मन:पूर्वक शुभेच्छा..!
राजमाता जिजाऊ शिक्षण संस्था, चिखली
अध्यक्ष: अँड. सुरेशराव वानखेडे यांच्या प्रेरणेतून
महादजी दर्याजी पाटील माध्यमिक विद्यालय, बेलगाव ज्ञान – संस्कार – प्रगती
::संस्था पदाधिकारी::
»अध्यक्ष: ॲड. सुरेशराव वानखेडे »उपाध्यक्ष: सुधीर भाऊ वानखेडे »सचिव: ॲड. संदीप भाऊ वानखेडे
»संचालक: प्रकाशराव बाजड, सतीश भाऊ वानखेडे
मुख्याध्यापक: श्री. दीपक कुटे सर
:: समर्पित शिक्षकवृंद ::
पी. बी. कावरखे सर • एच. एल. वानखेडे सर • एन. टी. गीते सर •व्ही. ए. मेटांगळे सर
• एस. पी. रहाटे सर • ए. व्ही. जायभाये सर •ए. व्ही. गायकवाड सर • के. एम. मेटांगळे सर
• आर. आर. साखरे •व्ही. वाय. दाभाडे • पुनम वानखेडे मॅडम • एस. कांबळे, जी. एफ. देशमुख व समस्त कर्मचारी
अँड. सुरेशराव वानखेडे
अध्यक्ष: महादजी दर्याजी पाटिल
माध्यमिक विद्यालय बेलगा
आमचे ध्येय: विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत नैतिक मूल्ये,
शिस्त आणि संस्कार देऊन सर्वांगीण विकास साधणे.
शाळेची वैशिष्ट्ये: »अनुभवी शिक्षकवर्ग »आधुनिक तंत्रज्ञानाधारित शिक्षण » सांस्कृतिक, क्रीडा व
विज्ञान उपक्रम विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी सतत मार्गदर्शन
महादजी दर्याजी पाटिल माध्यमिक विद्यालय,बेलगाव
"ज्ञानाच्या प्रकाशात उजळू दे
प्रत्येक विद्यार्थीचं भविष्य!"


सर्वत्र प्रेमाचा सुगंध पसरला आनंदाचा दिवस
आला देवाकडे माझी एकच प्रार्थना सुख-समृद्धी लाभू दे तुम्हाला
दिपावलीच्या
सर्व जनतेला
हार्दिक शुभेच्छा
मा.गजानन महापुरे
शुभेच्छूक-
मा.रामभाऊ महापुरे
हॉटेल कृष्णा डोणगाव.


। अंगण सजले फुल आणि रांगोळ्यांनी,
स्वागत करण्यास दिवाळीसणाची ।
।। तोरणे आकाश कंदिल लागले दारी, आली दिवाळी आपुल्या घरी ।।
दिपावलीच्या
समस्त जनतेला
हादिक शुभेच्छा
शुभेच्छूक:- मा.श्री.सुरज दिनोरे
शिवसेना शहर प्रमुख डोणगाव.


अंध:कारावर प्रकाशाचा,
दु:खावर आनंदाचा आणि
द्वेषावर प्रेमाचा विजय होवो...
आपल्या सर्वांच्या आयुष्यात
समृद्धी, सुख, शांती आणि समाधानाचे दीप
तेजाने उजळू देत!
दिपावलीच्या
समस्त जनतेला
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक:- श्री.विजय केशवराव जागृत